# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## Savitribai Phule Pune University

**(Formerly University of Pune)**


**अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष**
गणेशखिंड, पुणे – ४११००७
दूरध्वनी क्रमांक: ०२०-२५६२१०४५/८/९/५१
ई-मेल: iqac@unipune.ac.in
संकेतस्थळ:www.unipune.ac.in

**Internal Quality Assurance Cell**
Ganeshkhind, Pune – 411007
Contact No.: 020-25621045/8/9/51
E-mail: iqac@unipune.ac.in
Website: www.unipune.ac.in


अंगुहक/२०२६/७१०　　　　　　　　　　दिनांक : २०/०९/२०२६

# परिपत्रक

**प्रति,**

**मा. प्राचार्य / संचालक / विभागप्रमुख,**
**सर्व संलग्न महाविद्यालये / स्वायत्त महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था तसेच विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग,**
**प्रस्तुत विद्यापीठ,**
**पुणे – ४११००७**

**विषय : "Aavishkar / Anveshan" संशोधन स्पर्धा व इतर संशोधनविषयक उपक्रमांसाठी तज्ज्ञ मंडळ (Expert Panel) तयार करण्याकरिता माहिती संकलित करण्याबाबत परिपत्रक........**

**महोदय / महोदया,**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत **Aavishkar / Anveshan / ASPIRE** तसेच इतर संशोधनविषयक उपक्रमांचे आयोजन, मूल्यमापन व मार्गदर्शन करण्यासाठी विविध विषयांतील तज्ज्ञांचे **तज्ज्ञ मंडळ (Expert Panel)** तयार करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने आपल्या महाविद्यालय / संस्था / विद्यापीठ विभागातील पात्र व इच्छुक **प्राध्यापक / संशोधक / विषयतज्ज्ञ** यांची शैक्षणिक, संशोधनविषयक व व्यावसायिक माहिती संकलित करण्यात येत आहे.

इच्छुक तज्ज्ञांनी खालील Google Form मध्ये आपली माहिती **अचूक, अद्ययावत व पूर्ण स्वरूपात दिनांक २४ सप्टेंबर २०२६ पर्यंत** खालील Google Form Link द्वारे भरावी.

**Google Form Link: https://forms.gle/4xEW2QEUWiufi6Em9**

**Aavishkar / Anveshan – Expert Information & Consent Form 2026–27**

**Google Form मध्ये प्रामुख्याने खालील माहिती मागविण्यात येत आहे :**

1. **वैयक्तिक व व्यावसायिक माहिती** – नाव, पदनाम, विभाग / संस्था, अध्यापनाचे ठिकाण, ई-मेल व भ्रमणध्वनी क्रमांक.
2. **विशेषीकरण व संशोधन क्षेत्र** तसेच संशोधन प्रकाशनांची माहिती – **Scopus, Web of Science (WoS), UGC-CARE व इतर संबंधित डेटाबेसनुसार.**
3. **अध्यापन / संशोधन अनुभव** व संबंधित कागदपत्रे.
4. **Ph.D. मार्गदर्शनाची माहिती** – Ph.D. Awarded व Ongoing.
5. **पूर्ण व सुरू असलेल्या संशोधन प्रकल्पांची माहिती**, संबंधित निधी पुरविणाऱ्या संस्था / यंत्रणेनुसार तसेच इतर संस्थांकडून मंजूर प्रकल्पांची माहिती.
6. पूर्ण व सुरू असलेल्या संशोधन प्रकल्पांची **Sanction Letters** एकत्रित PDF स्वरूपात.
7. **Aavishkar / Anveshan / ASPIRE** किंवा इतर संशोधनविषयक स्पर्धा / उपक्रमांमध्ये Expert / Judge / Evaluator / Mentor म्हणून केलेल्या कार्याचा अनुभव.

8. अद्ययावत **Curriculum Vitae (C.V.).**
9. अध्यापनाच्या ठिकाणाबाहेर / इतर शहरात **Expert म्हणून कार्य करण्याची तयारी** व पसंतीचे ठिकाण.
10. **Aavishkar / Anveshan** स्पर्धेच्या सुधारणा व गुणवत्तावाढीसाठी सूचना तसेच इतर अतिरिक्त माहिती.
11. तज्ज्ञ मंडळामध्ये समाविष्ट होण्यासाठी आवश्यक **Declaration & Consent**.

## महत्त्वाच्या सूचना :

- तज्ज्ञांनी सादर केलेली माहिती **अचूक व अद्ययावत** असणे आवश्यक आहे.
- संबंधित कागदपत्रे Google Form मध्ये नमूद केलेल्या **File Format व File Size** नुसारच Upload करावीत.
- संशोधन प्रकल्पांची Sanction Letters उपलब्ध असल्यास संबंधित सर्व पत्रे **एकत्रित करून एकाच PDF स्वरूपात** Upload करावीत.
- Google Form सादर केल्याने कोणत्याही विशिष्ट कार्यक्रमासाठी Expert म्हणून नियुक्ती निश्चित झाल्याचे समजण्यात येऊ नये.
- तज्ज्ञ मंडळामधून तज्ज्ञांची नियुक्ती संबंधित उपक्रमाची आवश्यकता, विषयातील तज्ज्ञता, उपलब्धता व विद्यापीठाच्या निर्णयानुसार करण्यात येईल.
- संकलित माहितीचा उपयोग **Aavishkar / Anveshan / ASPIRE व इतर संशोधनविषयक उपक्रमांसाठी तज्ज्ञ मंडळ तयार करणे, तज्ज्ञांचे मूल्यमापन / मार्गदर्शन व सहभाग निश्चित करणे** यासाठी करण्यात येईल.

## तज्ज्ञ कार्यशाळेबाबत :

तज्ज्ञ मंडळाच्या अनुषंगाने **तज्ज्ञ कार्यशाळा दि. २९ सप्टेंबर २०२६ रोजी (अंदाजे)** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे आयोजित करण्याचे नियोजित आहे. सदर कार्यशाळेची अंतिम तारीख, वेळ, स्थळ व इतर आवश्यक तपशील तसेच तज्ज्ञ म्हणून आपल्या निवडीबाबतची माहिती, संबंधित तज्ज्ञांनी Google Form मध्ये नोंदविलेल्या **ई-मेल पत्त्यावर** स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

या अनुषंगाने संबंधित इच्छुक तज्ज्ञांनी आवश्यक माहिती व कागदपत्रे **दि. २४ सप्टेंबर २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी** Google Form मध्ये अचूक, अद्ययावत व पूर्ण स्वरूपात भरून सादर करावीत.

सदर माहितीचा उपयोग **Expert Panel तयार करणे तसेच Aavishkar / Anveshan / ASPIRE आणि इतर संशोधनविषयक उपक्रमांमध्ये तज्ज्ञांचे मूल्यमापन / मार्गदर्शन / सहभाग निश्चित करण्यासाठी** करण्यात येईल.

**टीप :** Google Form भरल्याने कोणत्याही विशिष्ट कार्यक्रमासाठी Expert म्हणून नियुक्ती निश्चित झाल्याचे समजण्यात येऊ नये. तज्ज्ञांची नियुक्ती संबंधित उपक्रमाची आवश्यकता, विषयानुरूपता, उपलब्धता व विद्यापीठाच्या निर्णयानुसार करण्यात येईल.

तरी संबंधित महाविद्यालये / संस्था / विद्यापीठ विभागांनी आपल्या अधिपत्याखालील पात्र व इच्छुक **प्राध्यापक / संशोधक / विषयतज्ज्ञ** यांना सदर Google Form बाबत अवगत करून, त्यांनी विहित मुदतीत माहिती सादर करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी.

**प्रा. डॉ. विनायक जोशी**
**संचालक**
अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे – ४११००७